# बृहन्मुंबई महानगरपालिका

प्र.अभि/विनि/28514 /साधारण, दि.११/०३/२०२४

परिपत्रक प्र अभि/विनि/221 . /साधा.

**२०२४-२०२५**

**विषयः**-१) बृहन्मुंबईतील इमारत प्रस्ताव निकालात काढण्याकारिता त्यांच्या मान्यतेकरिता छाननी शुल्क वाढविण्याबाबत.

२) ना मंजुरीचे प्रमाणपत्र व काम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रांच्या पुनर्विधीग्राहयतांकरिता (रिव्हॅलिडेशन) शुल्क वाढविण्याबाबत व शहर आणि उपनगरांमधील इमारत प्रस्तावांचे विलंब शुल्क (आकारणी) याबाबत.

**संदर्भ**:- १) महानगरपालिकेचा ठराव क्र.११४९,दि.०४.०२.२०१०.

२) महानगरपालिकेचा ठराव क्र.१२९,दि.२४.०६.२०१९.

३) प्रअ/वि.नि/०००0१/साधा. दि.०१.०४.२०२०.

४) प्रअ/वि.नि/२०५४८/साधा. दि.१०.०२.२०२१.

५) प्रअ/वि.नि/ २०५४८/साधा. दि.११.०२.२०२२.

६) प्रअ/वि.नि/ २९१४२/साधा. दि.२०.०२.२०२३

७) प्रअ/वि.नि/२५६६१/साधा दि. ०२.०२.२०२४

महानगरपालिकेच्या ठराव क्र. ११४९ दि. ०४.०२.२०१० नुसार सध्या I) बृहन्मुंबईतील इमारत प्रस्ताव निकालात काढण्याकरीता तसेच त्यांच्या मान्यतेकरीता छाननी शुल्क II) ना मंजूरीचे प्रमाणपत्र व काम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रांच्या पुनर्विधीग्राहयतांकरिता शुल्क आणि शहर आणि उपनगरांमधील इमारत प्रस्तावाचे विलंब शुल्क यांची अनुसूची अंमलात होती.

तदंनतर, महानगरपालिकेचा ठराव क्र. १२९ दि. २४ जुन २०१९ नुसार सदर शुल्क अनुसूची सुधारित करण्यास सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'एक्स', 'वाय' आणि 'झेड' मध्ये दिलेल्या पुनर्विधीग्राहयतांकरिता शुल्काची पुनर्रचित अनुसूची सन २०१८-१९ या वर्षाकरिता महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार, १ एप्रिलपासून सुधारित दरानुसार शुल्क आकारण्यास, सन २०१८-२०१९ साठी व त्यानंतर येणा-या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून रु.५०० पर्यंतच्या विद्यमान आकार शुल्कामध्ये १०% इतकी वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकांत असल्यास सुधारित शुल्क दर पुढील रुपयाच्या पूर्णांकांत लागू करण्यास व रु.५०० पेक्षा अधिक विद्यमान शुल्कामध्ये १०% इतकी वाढ करुन येणारे सुधारित शुल्क दर पुढील रु.१०/- च्या पूर्णांकांत लागू करण्याबाबत मंजुरी प्राप्त झाली आहे. त्या नुसार सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०२० पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक संदर्भ क्र.३ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०२१ पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक संदर्भ क्र.४ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०२२ पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक संदर्भ क्र.५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०२३ पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक संदर्भ क्र.६ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. तसेच सन २०२३-२०२४ या कालावधीकरीता पुनर्रचित केलेली शुल्काची श्रेणीमध्ये आवश्यक असलेला बदल करुन शुध्दीपत्रक संदर्भ क्र.७ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ वर्षाकरिता दि. ०१.०४.२०२४ पासून सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'एक्स', 'वाय' आणि 'झेड' मध्ये नमूद केल्यानुसार सुधारित शुल्काप्रमाणे दर लागू करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता<br>(विकास नियोजन) शहर | उप प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन)-१ | प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन) प्र |

## परिशिष्ट 'एक्स'

| अनु. क्र. | उद्दिष्ट | दि. २४.०६.२०१९ च्या ठराव क्र.१२९ अन्वये मंजुर केलेल्या शुल्कांची श्रेणी (सन २०२३-२४ करिता) | पुनर्रचित केलेली शुल्कांची श्रेणी (२०२४-२५) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ) | मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३३७ खाली इमारतीचे बांधकाम अथवा पुनर्बांधकाम | १) निवासी वापरण्याकरिता प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरिता रु. ११६०/- किमान दराने रु १०६४०/- सह | १) निवासी वापरण्याकरिता प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरिता रु.१२८०/- किमान दराने रु.११७१०/- सह |
| | | २) व्यावसायिक वापराकरिता प्रति १० चौ.मी. ला अथवा त्यावरील भागाकरिता रु.२३००/- किमान रु.२१२८०/- सह | २) व्यावसायिक वापराकरिता प्रति १० चौ.मी. ला अथवा त्यावरील भागाकरिता रु.२५३०/- किमान रु.२३४१०/- सह |
| | | ३)औद्योगिक वापराकरिता प्रति रु.१० चौ.मी.ला अथवा त्यावरील भागाकरिता रु.१७४० /- किमान रु.१६१२०/- सह | ३)औद्योगिक वापराकरिता प्रति रु.१० चौ.मी.ला अथवा त्यावरील भागाकरिता रु.१९२०/- किमान रु.१७७४०/- सह |
| ब) | मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३४२ खाली विद्यमान इमारतीमध्ये जेथे क्षेत्र नियोजित केले आहे, बदल आणि अथवा भर करण्याकरिता. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे |
| क) | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३४२ खाली कोणत्याही अतिरिक्त क्षेत्राचा समावेश नाही. तेथे बदल करण्याकरिता. | १) निवासी वापराच्या प्रति प्रस्तावाला रु.११४१०/- | १) निवासी वापराच्या प्रति प्रस्तावाला रु.१२५६०/- |
| | | २) व्यावसायिक वापराच्या प्रति प्रस्तावाला रु.२२८००/- | २) व्यावसायिक वापराच्या प्रति प्रस्तावाला रु.२५०८०/- |
| | | ३) औद्योगिक वापराच्या प्रति प्रस्तावाला रु.१७२५०/- | ३) औद्योगिक वापराच्या प्रति प्रस्तावाला रु.१८९८०/- |
| ड) | मंजूर प्रस्तावांच्या सुधारित | एक-प्रत्येक सुधारित प्रस्तावासह, ज्यादा चटईक्षेत्र नियोजित | एक-प्रत्येक सुधारित प्रस्तावासह, ज्यादा चटईक्षेत्र नियोजित केले |

| | | | |
|---|---|---|---|
| | आराखडयाबाबतीत | केले नसल्यास खाली दिलेल्या दराने शुल्क वसूल केले जाईल. | नसल्यास खाली दिलेल्या दराने शुल्क वसूल केले जाईल. |
| | | अ) निवासी वापराकरीता बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. ला त्यावरील भागाकरिता रु.२७९/- किमान रु.१६१२०/- सापेक्ष | अ) निवासी वापराकरीता बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. ला त्यावरील भागाकरिता र.३०७/- किमान रु.१७७४०/- सापेक्ष |
| | | ब) व्यावसायिक वापराकरीता, बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.ला अथवा त्यावरील भागाकरीता रु.५७०/- किमान रु.३२२२०/-सापेक्ष | ब) व्यावसायिक वापराकरीता, बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.ला अथवा त्यावरील भागाकरीता रु.६३०/- किमान रु.३५४५०/-सापेक्ष |
| | | क) औद्योगिक वापराकरीता, प्रति १० चौ.मी.ला अथवा त्यावरील भागाकरीता रु.४३४/- किमान रु.२४१७०/- सापेक्ष | क) औद्योगिक वापराकरीता, प्रति १० चौ.मी.ला अथवा त्यावरील भागाकरीता रु.४७८/- किमान रु.२६५९०/- सापेक्ष |
| | | दोन – अतिरिक्त चटईक्षेत्र नियोजित केल्यास, पुढे दिलेल्या दराने छाननी शुल्क वसूल केले जाईल. (नियोजित अतिरिक्त बांधकामव्याप्त क्षेत्राकरीता) | दोन – अतिरिक्त चटईक्षेत्र नियोजित केल्यास, पुढे दिलेल्या दराने छाननी शुल्क वसूल केले जाईल. (नियोजित अतिरिक्त बांधकामव्याप्त क्षेत्राकरीता) |
| | | अ) निवासी वापराकरिता (पूर्वी मंजूर झालेल्या बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरीता रु.२७९/- प्रमाणे) अधिक (अतिरिक्त प्रस्तावित बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरीता रु.११६०/- प्रमाणे) असे एकूण छाननी शुल्क किमान रु.१६१२०/- सापेक्ष | अ) निवासी वापराकरिता (पूर्वी मंजूर झालेल्या बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरीता रु.३०७/- प्रमाणे) अधिक (अतिरिक्त प्रस्तावित बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरीता रु.१२८०/- प्रमाणे) असे एकूण छाननी शुल्क किमान रु.१७७४०/- सापेक्ष |
| | | ब) व्यावसायिक वापराकरीता (पूर्वी मंजूर झालेल्या बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. अथवा त्यावरील भागाकरीता रु ५७०/- प्रमाणे) अधिक (अतिरिक्त प्रस्तावित बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. अथवा त्यावरील भागाकरिता रु.२३००/- प्रमाणे) असे एकूण छाननी शुल्क किमान रु.३२२२०/- सापेक्ष | ब) व्यावसायिक वापराकरीता (पूर्वी मंजूर झालेल्या बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. अथवा त्यावरील भागाकरीता रु.६३०/- प्रमाणे) अधिक (अतिरिक्त प्रस्तावित बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. अथवा त्यावरील भागाकरिता रु.२५३०/- प्रमाणे) असे एकूण छाननी शुल्क किमान रु.३५४५०/- सापेक्ष |
| | | क) औद्योगिक वापराकरीता (पूर्वी मंजूर झालेल्या बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील | क) औद्योगिक वापराकरीता (पूर्वी मंजूर झालेल्या बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी.अथवा त्यावरील भागाकरीता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भागाकरीता रु४३४ /- प्रमाणे) अधिक अतिरिक्त प्रस्तावित बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. अथवा त्यावरील भागाकरीता रु.१७४०/- प्रमाणे) असे एकूण छाननी शुल्क किमान रु.२४१७०/- सापेक्ष | रु.४७८/- प्रमाणे) अधिक अतिरिक्त प्रस्तावित बांधकाम व्याप्त क्षेत्राच्या प्रति १० चौ.मी. अथवा त्यावरील भागाकरीता रु.१९२०/- प्रमाणे) असे एकूण छाननी शुल्क किमान रु.२६५९०/- सापेक्ष |
| | | तीन – (अ) मंजूर भाग/ पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त क्षेत्रामध्ये सुधारित आराखडे/ बदलासह उर्वरित क्षेत्रामध्ये सुधारित आराखडे व बदल प्रस्ताविले असल्यास, यापूर्वी मंजूर भाग/ पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र क्षेत्राकरीता वरील एक नुसार किमान छाननी शुल्क वसुल केले जाईल व उर्वरित क्षेत्राकरिता वरील अनु.क्र.एक व दोन नुसार सुधारित छाननी शुल्क वसूल केले जाईल.<br>(ब) मंजूर भाग/पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त क्षेत्रामध्ये कोणताही बदल प्रस्तावित नसल्याचे संबंधित वास्तुविशारद परवानाधारक सर्व्हेक्षक यांनी प्रमाणित केल्यास, त्यावर कोणतेही छाननी शुल्क आकारले जाणार नाही. उर्वरित क्षेत्रासाठी वरील अनु.क्र. एक व दोन नुसार सुधारित छाननी शुल्क वसूल केले जाईल. | तीन – (अ) मंजूर भाग/ पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त क्षेत्रामध्ये सुधारित आराखडे/ बदलासह उर्वरित क्षेत्रामध्ये सुधारित आराखडे व बदल प्रस्ताविले असल्यास, यापूर्वी मंजूर भाग/ पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र क्षेत्राकरीता वरील एक नुसार किमान छाननी शुल्क वसुल केले जाईल व उर्वरित क्षेत्राकरिता वरील अनु.क्र.एक व दोन नुसार सुधारित छाननी शुल्क वसूल केले जाईल.<br>(ब) मंजूर भाग/पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त क्षेत्रामध्ये कोणताही बदल प्रस्तावित नसल्याचे संबंधित वास्तुविशारद परवानाधारक सर्व्हेक्षक यांनी प्रमाणित केल्यास, त्यावर कोणतेही छाननी शुल्क आकारले जाणार नाही. उर्वरित क्षेत्रासाठी वरील अनु.क्र. एक व दोन नुसार सुधारित छाननी शुल्क वसूल केले जाईल. |

कार्यकारी अभियंता
(विकास नियोजन)शहर

उप प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)१

प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)(प्र)

## परिशिष्ट 'वाय'

**<u>इमारत प्रस्तावांच्या पुनर्विधीग्राह्यतेकरिता शुल्क</u>**

| अनु.क्र. | उद्दिष्ट | दि.२४.०६.२०१९ च्या ठराव क्र.१२९ अन्वये मंजूर केलेल या शुल्कांची श्रेणी (सन २०२३-२४ करिता ) | | | छाननी शुल्कांची नियोजित पुनर्रचित श्रेणी (२०२४-२५) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केवळ निवासी व्याप्तीकरीता (अ) | निवासी व्यतिरिक्त इतर व्याप्तीकरीता (ब) | | केवळ निवासी व्याप्तीकरिता (अ) | निवासी व्यतिरिक्त इतर व्याप्तीकरीता (ब) | |
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ | |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| अ) | सी.सी.प्रमाणपत्र दिले नसल्यास, सी.सी. अथवा आय.ओ.डी. प्रमाणपत्राची तारीख संपण्याच्या १ महिन्यांच्या आत आय.ओ.डी. व सी.सी. प्रमाणपत्रांसह प्रगती अहवालांसह पुनर्विधीग्राह्यतेकरीता अर्ज केला आहे अशा प्रकरणी | रु.११४१०/- | रु.२२८००/- | रु.१७२५०/- | रु.१२५६०/- | रु.२५०८०/- | रु.१८९८०/- |
| ब) | सी.सी.प्रमाणपत्र दिले नसल्यास, सी.सी. अथवा आय.ओ.डी. च्या तारखेच्या १ महिन्यांनंतर परंतु ३ महिन्याच्या आत आय.ओ.डी. व सी.सी. व आराखडयासह, प्रगती अहवालांसह, पुनर्विधीग्राह्यतेकरीता अर्ज केल्यास | रु ११४१०/-<br>रु ११४१०/-<br>(विलंब शुल्क)<br>----------<br>रु.२२८२०/ | रु. २२८००/-<br>रु. २२८०० /-<br>(विलंब शुल्क)<br>---------------<br>रु.४५६००/- | रु. १७२५०/-<br>रु. १७२५० /-<br>(विलंब शुल्क)<br>-----------<br>रु.३४५००/- | रु.१२५६०/-<br>रु.१२५६०/-<br>(विलंब शुल्क)<br>---------------<br>रु.२५१२०/ | रु. २५०८० /-<br>रु. २५०८० /-<br>(विलंब शुल्क)<br>--------------<br>रु.५०१६०/- | रु. १८९८० /-<br>रु. १८९८० /-<br>(विलंब शुल्क)<br>----------------<br>रु.३७९६०/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क) | सी.सी.प्रमाणपत्र दिले नसल्यास, सी.सी. प्रमाणपत्र अथवा आय.ओ.डी. च्या विधीग्राहयतेच्या तारखेच्या तीन महिन्यानंतर आय.ओ.डी. व सी.सी. व आराखडे यासह प्रगती अहवालांसह पुनर्विधीग्राहयतेकरीता अर्ज केला आहे अशा प्रकरणी | रु.२२८००/- अधिक प्रतिमास रु.५७२०/- अथवा त्यावरील भाग या दराने विधी ग्राहय तारखेनंतर तीन महिन्यांच्या वरील कालावधीकरीता विलंबशुल्क | रु.४५५२०/- अधिक प्रतिमास रु.११४१०/- अथवा त्यावरील भाग या दराने विधी ग्राहय तारखेनंतर तीन महिन्यांच्या वरील कालावधीकरीता विलंबशुल्क | र.३४४८०/- अधिक प्रतिमास रु.८६४०/- अथवा त्यावरील भाग या दराने विधी ग्राहय तारखेनंतर तीन महिन्यांच्या वरील कालावधीकरीता विलंबशुल्क | रु.२५०८०/- अधिक प्रतिमास रु.६३००/- अथवा त्यावरील भाग या दराने विधी ग्राहय तारखेनंतर तीन महिन्यांच्या वरील कालावधीकरीता विलंबशुल्क | रु.५००८०/- अधिक प्रतिमास रु.१२५६०/- अथवा त्यावरील भाग या दराने विधी ग्राहय तारखेनंतर तीन महिन्यांच्या वरील कालावधीकरीता विलंबशुल्क | र.३७९३०/- अधिक प्रतिमास रु.९५१०/- अथवा त्यावरील भाग या दराने विधी ग्राहय तारखेनंतर तीन महिन्यांच्या वरील कालावधीकरीता विलंबशुल्क |

टिप – परिशिष्ट 'झेड' च्या नियम क्र.१(ब) मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या कुंपण भिंत, खेचपंप, उदंचन केंद्र, यानगृह, विद्युत उपरस्थानक वगैरे सारख्या बाबींकरीता सी.सी. किंवा जर सी.सी.निर्गमित करण्यात आली नसेल तर आय.ओ.डी.ची विधीग्राहयता वाढविण्यासाठी वरील मूळ दराच्या २५ टक्के दराने शुल्क आकारण्यात येईल.

कार्यकारी अभियंता
(विकास नियोजन)शहर

उप प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)-१

प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)

# परिशिष्ट – झेड

छाननी शुल्क व आय.ओ.डी. व सी.सी.ची पुनर्विधीग्राह्यता याकरीता नियम.

| अनु. क्र. | विद्यमान नियम (२०२३-२०२४) | आता नियोजित केलेले नियम (२०२४-२०२५) |
|---|---|---|
| 1 (अ) | (१) चित्रपटगृहांच्या, पेट्रोल पंप व पेट्रोल सर्व्हिस स्थानक वगैरेच्या जागेच्या मंजुरीच्या प्रस्तावाकरीता रु . ७२६०/- इतके शुल्क आकारले जाईल. तथापि, वापरातील बदलांचे प्रस्ताव उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण यांचा समावेश असलेले प्रस्ताव याकरीता निवासी व व्यावसायिक भूखंडाकरीता २५०० चौ .मी. पर्यंत व औद्योगिक भूखंडाकरीता १००० चौ.मी. पर्यंत रु ४४८४०/- इतके शुल्क आकारले जाईल. अनुक्रमे २५०० चौ .मी. व १००० चौ.मी. पेक्षा कोणत्याही अतिरिक्त क्षेत्राकरीता वरील मूळ दरांवर प्रमाणशीर शुल्क आकारले जाईल.<br>**(२)** वापरातील बदलाचे प्रस्ताव, उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण यांचा समावेश असलेले सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यास , यापूर्वी मंजूर बदलाचे प्रस्ताव , उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण यात कोणताही बदल प्रस्तावित नसल्यास , यापूर्वी मंजूर प्रस्तावाच्या क्षेत्रासाठी रु . ४४८४०/- इतके छाननी शुल्क आकारण्यात येईल व सुधारित प्रस्तावातील उर्वरित क्षेत्रासाठी वरील एक प्रमाणे छाननी शुल्क आकारण्यात येईल.<br>(३) तसेच यापूर्वी मंजूर बदलाचे प्रस्ताव , उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण प्रस्तावाच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल प्रस्तावित असल्यास, सुधारित प्रस्तावाला वरीलप्रमाणे छाननी शुल्क आकारण् यात येईल. | (१) चित्रपटगृहांच्या, पेट्रोल पंप व पेट्रोल सर्व्हिस स्थानक वगैरेच्या जागेच्या मंजुरीच्या प्रस्तावाकरीता रु.७९९०/- इतके शुल्क आकारले जाईल. तथापि, वापरातील बदलांचे प्रस्ताव उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण यांचा समावेश असलेले प्रस्ताव याकरीता निवासी व व्यावसायिक भूखंडाकरीता २५०० चौ.मी. पर्यंत व औद्योगिक भूखंडाकरीता १००० चौ.मी. पर्यंत रु ४९३३०/- इतके शुल्क आकारले जाईल. अनुक्रमे २५०० चौ.मी. व १००० चौ.मी. पेक्षा कोणत्याही अतिरिक्त क्षेत्राकरीता वरील मूळ दरांवर प्रमाणशीर शुल्क आकारले जाईल.<br>(२) वापरातील बदलाचे प्रस्ताव, उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण यांचा समावेश असलेले सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यास , यापूर्वी मंजूर बदलाचे प्रस्ताव , उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण यात कोणताही बदल प्रस्तावित नसल्यास, यापूर्वी मंजूर प्रस्तावाच्या क्षेत्रासाठी रु . ४९३३०/- इतके छाननी शुल्क आकारण्यात येईल व सुधारित प्रस्तावातील उर्वरित क्षेत्रासाठी वरील एक प्रमाणे छाननी शुल्क आकारण्यात येईल.<br>(३) तसेच यापूर्वी मंजूर बदलाचे प्रस्ताव , उपविभाजन व आखणी आराखडे व एकत्रीकरण प्रस्तावाच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल प्रस्तावित असल्यास ,सुधारित प्रस्तावाला वरीलप्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. |
| 1 (ब) | कुंपण भिंत, शोष टाकी, यानगृह, उदंचन केंद्र, विद्युत उपस्थानक व मुंबई दुरुस्ती व पुनर्बांधकाम मंडळाकडून आवश्यक असणारी दुरुस्तीखालील स्वच्छतागृहांचे प्रस्ताव याकरीता प्रति प्रस्तावाला रु.३४७०/- या दराने शुल्क आकारले जाईल. | कुंपण भिंत, शोष टाकी, यानगृह, उदंचन केंद्र, विद्युत उपस्थानक व मुंबई दुरुस्ती व पुनर्बांधकाम मंडळाकडून आवश्यक असणारी दुरुस्तीखालील स्वच्छतागृहांचे प्रस्ताव याकरीता प्रति प्रस्तावाला रु.३८२०/- या दराने शुल्क आकारले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| 2) | शुल्क आकारण्याच्या उदिद्ष्टांकरीता विवरणपत्रात दर्शविल्यानुसार नियोजित कामाकरीता, नियोजित बांधकामव्याप्त क्षेत्र आधार मानले जाईल. त्यानंतर वरील क्षेत्र कमी अथवा जास्त झाल्यास अतिरिक्त शुल्क द्यावे लागेल अथवा जादा वसुली परत दिली जाईल.<br>तसेच विकास नियंत्रण नियमावली नुसार चटईक्षेत्र निर्देशांकात गणना केले जात नाही अशा बांधकामव्याप्त क्षेत्रफळासाठी देखील छाननी शुल्क आकारण्यात येईल. | शुल्क आकारण्याच्या उदिद्ष्टांकरीता विवरणपत्रात दर्शविल्यानुसार नियोजित कामाकरीता, नियोजित बांधकामव्याप्त क्षेत्र आधार मानले जाईल.. त्यानंतर वरील क्षेत्र कमी अथवा जास्त झाल्यास अतिरिक्त शुल्क द्यावे लागेल अथवा जादा वसुली परत दिली जाईल.<br>तसेच विकास नियंत्रण नियमावली नुसार चटईक्षेत्र निर्देशांकात गणना केले जात नाही अशा बांधकामव्याप्त क्षेत्रफळासाठी देखील छाननी शुल्क आकारण्यात येईल. |
| 3 (अ) | सूचना देणा-या व्यक्तीने महानगरपालिकेला शुल्क प्रदान न केल्यास कलम ३३७/३४२ व ३०२ खाली कोणतीही सूचना विधीग्राह्य राहणार नाही.. | सूचना देणा-या व्यक्तीने महानगरपालिकेला शुल्क प्रदान न केल्यास कलम ३३७/३४२ व ३०२ खाली कोणतीही सूचना विधीग्राह्य राहणार नाही.. |
| 3 (ब) | मालकी हक्कातील बदल अथवा वास्तुशास्त्रज्ञाचा बदल अशा प्रकरणी आराखडयात कोणताही बदल अथवा सुधारणा नसल्यास कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. | मालकी हक्कातील बदल अथवा वास्तुशास्त्रज्ञाचा बदल अशा प्रकरणी आराखडयात कोणताही बदल अथवा सुधारणा नसल्यास कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. |
| 3 (क) | अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या प्रस्तावाप्रकरणी कलम ३३७/३४२ खाली सूचना आवश्यक असेल. तसेच मंजूर श्रेणीनुसार शुल्क प्रदान करावे लागेल. | अनधिकृत बांधकामे नियमित करण्याच्या प्रस्तावाप्रकरणी कलम ३३७ /३४२ खाली सूचना आवश्यक असेल. तसेच मंजूर श्रेणीनुसार शुल्क प्रदान करावे लागेल. |
| 4 (अ) | प्रस्ताव नाकारला गेल्यास, १० टक्के शुल्क तसेच ठेवून उर्वरित शुल्क अर्जदाराला परत दिले जाईल. | प्रस्ताव नाकारला गेल्यास, १० टक्के शुल्क तसेच ठेवून उर्वरित शुल्क अर्जदाराला परत दिले जाईल. |
| 4 (ब) | प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वी पक्षकाराने सदर प्रस्ताव काढून घेतल्यास, १० टक्के शुल्क तसेच ठेवून उर्वरित शुल्क परत दिले जाईल. | प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वी पक्षकाराने सदर प्रस्ताव काढून घेतल्यास, १० टक्के शुल्क तसेच ठेवून उर्वरित शुल्क परत दिले जाईल. |
| 4 (क) | 'ना मंजूरीची सूचना' व काम सुरु करण्याचे प्रमाणपत्र दिल्यापासून व मंजूरीच्या तारखेपासून १ वर्षाच्या कालावधीत काम करण्याचा पक्षकाराचा उद्देश नसल्यास ५० टक्के शुल्क तसेच ठेवून उर्वरित परत दिले जाईल. | 'ना मंजूरीची सूचना' व काम सुरु करण्याचे प्रमाणपत्र दिल्यापासून व मंजूरीच्या तारखेपासून १ वर्षाच्या कालावधीत काम करण्याचा पक्षकाराचा उद्देश नसल्यास ५० टक्के शुल्क तसेच ठेवून उर्वरित परत दिले जाईल. |
| 5 | शासकीय व केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खाते, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन मंडळ व मुंबई विद्यापीठ यांना शुल्क प्रदान करण्यापासून वगळले आहे. वर्धनक्षम अथवा व्यावसायिक धर्तीवर चालणारी इतर सर्व शासकीय खाती व सार्वजनिक क्षेत्र, नगरपालिका/कंपनी/संविधिक अथवा इतर खाते उपक्रम यांना शुल्क | शासकीय व केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खाते, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन मंडळ व मुंबई विद्यापीठ यांना शुल्क प्रदान करण्यापासून वगळले आहे. वर्धनक्षम अथवा व्‍ यावसायिक धर्तीवर चालणारी इतर सर्व शासकीय खाती व सार्वजनिक क्षेत्र, नगरपालिका/कंपनी/संविधिक अथवा इतर खाते उपक्रम यांना शुल्क प्रदानापासून वगळण्यात येणार नाही. अर्ज करणा-या संघटनेने शुल्क प्रदान करावे की नाही |

| | | |
|---|---|---|
| | प्रदानापासून वगळण्यात येणार नाही. अर्ज करणा-या संघटनेने शुल्क प्रदान करावे की नाही असा संभ्रम पडल्यास, तत्संबंधी महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय अंतिम राहिल. | असा संभ्रम पडल्यास, तत्संबंधी महानगरपालिका आयुक्तांचा निर्णय अंतिम राहिल. |
| 6 | वरील दर फक्त निवासी घरांकरीताच आहेत. इतर उपक्रमांकरीता विशेष विनिर्दिष्ट बाबी वगळता, वरील दरांच्या दुप्पट दर राहतील. | वरील दर फक्त निवासी घरांकरीताच आहेत. इतर उपक्रमांकरीता विशेष विनिर्दिष्ट बाबी वगळता, वरील दरांच्या दुप्पट दर राहतील. |
| 7 | कमी उत्पन्नाचा गट, राज्यशासनाने अर्थसहाय्य दिलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांना शुल्क प्रदान करण्यातून वगळण्यात येईल. नोंदणीकृत कमी उत्पन्नाचे गट, सहकारी गृहनिर्माण संस्था व झोपडपट्टीवासियांच्या ३०० चौ.फुट पेक्षा अधिक क्षेत्र नसलेल्या सदनिकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांना शुल्क प्रदान करण्यापासून वगळण्यात येईल. | कमी उत्पन्नाचा गट, राज्यशासनाने अर्थसहाय्य दिलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांना शुल्क प्रदान करण्यातून वगळण्यात येईल. नोंदणीकृत कमी उत्पन्नाचे गट, सहकारी गृहनिर्माण संस्था व झोपडपट्टीवासियांच्या ३०० चौ.फुट पेक्षा अधिक क्षेत्र नसलेल्या सदनिकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था यांना शुल्क प्रदान करण्यापासून वगळण्यात येईल. |
| 8 अ) | उपरोक्त बाबीमध्ये दिलेल्या सहकारी संस्था वगळता, सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना किमान रु.१०६४०/- सापेक्ष, मूळ श्रेणीच्या ५० टक्के शूल्क आकारले जाईल. | उपरोक्त बाबीमध्ये दिलेल्या सहकारी संस्था वगळता, सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांना किमान रु.११७१०/- सापेक्ष, मूळ श्रेणीच्या ५० टक्के शूल्क आकारले जाईल. |
| 8 ब) | जेथे स्वतंत्र भूखंड मालकाकडून विकसित केला जाणार आहे अशा भूखंड मालकांकडून स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांबाबत आणि जेथे विकासाचा प्रस्ताव नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या चिटणीसांमार्फत न येता वैयक्तिक सादर झाला आहे अशा प्रकरणी, मूळ श्रेणीच्या शुल्काच्या ५० टक्के शुल्क कमी करण्याचा फायदा दिला जाणार नाही. | जेथे स्वतंत्र भूखंड मालकाकडून विकसित केला जाणार आहे अशा भूखंड मालकांकडून स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांबाबत आणि जेथे विकासाचा प्रस्ताव नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या चिटणीसांमार्फत न येता वैयक्तिक सादर झाला आहे अशा प्रकरणी, मूळ श्रेणीच्या शुल्काच्या ५० टक्के शुल्क कमी करण्याचा फायदा दिला जाणार नाही. |
| 9 | वैद्यकीय, शैक्षणिक व धर्मादाय संस्था व संस्था नोंदणी अधिनियम अथवा संस्था नोंदणी अधिनियम अथवा सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाखाली योग्य नोंदणीकृत असलेले विश्वस्त यांच्या प्रस्तावांबाबत, संपूर्ण जागा, विशिष्ट वापराकरीताच व्याप्त असेल या अटीसापेक्ष किमान रु.५७२०/- सापेक्ष मूळ श्रेणीच्या १/४ इतके शुल्क आकारले जाईल. | वैद्यकीय, शैक्षणिक व धर्मादाय संस्था व संस्था नोंदणी अधिनियम अथवा संस्था नोंदणी अधिनियम अथवा सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाखाली योग्य नोंदणीकृत असलेले विश्वस्त यांच्या प्रस्तावांबाबत, संपूर्ण जागा, विशिष्ट वापराकरीताच व्याप्त असेल या अटीसापेक्ष किमान रु.६३००/- सापेक्ष मूळ श्रेणीच्या १/४ इतके शुल्क आकारले जाईल. |
| 10 अ) | औद्योगिक उद्योगधंदे व व्यावसायिक इमारती, चित्रपटगृहे व मनोरंजन सभागृहे, उपहारगृहे व निवासस्थाने, पेट्रोल सर्विस स्थानक वगैरेंच्या प्रस्तावांबाबत विशिष्ट बाबी वगळता, किमान रु.५७२०/- सापेक्ष मूळ | औद्योगिक उद्योगधंदे व व्यावसायिक इमारती, चित्रपटगृहे व मनोरंजन सभागृहे, उपहारगृहे व निवासस्थाने, पेट्रोल सर्विस स्थानक वगैरेंच्या प्रस्तावांबाबत विशिष्ट बाबी वगळता, किमान रु.६३००/- सापेक्ष मूळ श्रेणीच्या दुप्पट दराने शुल्क |

| | | |
|---|---|---|
| | श्रेणीच्या दुप्पट दराने शुल्क आकारले जाईल. | आकारले जाईल. |
| 10 ब) | कोणताही बदल नाही. परंतु दर निर्धारित केल्याप्रमाणे राहतील. | कोणताही बदल नाही. परंतु दर निर्धारित केल्याप्रमाणे राहतील. |
| 10 क) | तथापि, दुकानरेषेसह रस्त्याला भिडणा-या विद्यमान बांधकामाबाबत, वरचे मजले केवळ निवासी वापराकरीताच नियोजित असल्यास त्याकरीता निवासी बांधकामाचेच शुल्क आकारण्यात येईल. | तथापि, दुकानरेषेसह रस्त्याला भिडणा-या विद्यमान बांधकामाबाबत, वरचे मजले केवळ निवासी वापराकरीताच नियोजित असल्यास त्याकरीता निवासी बांधकामाचेच शुल्क आकारण्यात येईल. |
| 11 | वरील कलमाच्या उदिष्टाकारीता केवळ एका दुकानासह असलेल्या नवीन इमारती इमारतीचा प्रस्तावही व्यावसायिक इमारत म्हणून मानण्यात येईल. तसेच, औद्योगिक आवारातील पहारेक-याचे निवासस्थान औद्योगिक इमारत मानले जाईल. तथापि, बॅक वैद्यकीय केंद्र, दवाखाना, जिम्नॅशियम, संग्रहालय वगैरे नियोजित वापर, स्वरुपाने व्यावसायिक असले व त्यांना संपूर्णत: निवासी पट्टयात परवानगी असली तरी, अशा वापरांच्या क्षेत्रांकरीता निवासी व व्यावसायिक वापराकरीता वेगेवेगळे शुल्क आकारले जाईल. | वरील कलमाच्या उदिष्टाकारीता केवळ एका दुकानासह असलेल्या नवीन इमारती इमारतीचा प्रस्तावही व्यावसायिक इमारत म्हणून मानण्यात येईल. तसेच, औद्योगिक आवारातील पहारेक-याचे निवासस्थान औद्योगिक इमारत मानले जाईल. तथापि, बॅक वैद्यकीय केंद्र, दवाखाना, जिम्नॅशियम, संग्रहालय वगैरे नियोजित वापर, स्वरुपाने व्यावसायिक असले व त्यांना संपूर्णत: निवासी पट्टयात परवानगी असली तरी, अशा वापरांच्या क्षेत्रांकरीता निवासी व व्यावसायिक वापराकरीता वेगेवेगळे शुल्क आकारले जाईल.. |
| 12 अ) | महानगरपालिका ठरावाच्या तारखेपासून सादर केलेल्या प्रस्तावांकरीता शुल्क परिमाणित होईल. | महानगरपालिका ठरावाच्या तारखेपासून सादर केलेल्या प्रस्तावांकरीता शुल्क परिमाणित होईल. |
| 12 ब) | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३४० /३४३ खाली प्रसृत केलेल्या पुढील तपशील विचारणा-या पत्रास सहा महिन्यांच्या आत वास्तुशास्त्रज्ञांकडून उत्तर न मिळाल्यास सदर प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात येईल व आकारलेल्या शुल्कांपैकी ९० टक्के शुल्क पक्षकारांना परत देण्यात येईल. | मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३४० /३४३ खाली प्रसृत केलेल्या पुढील तपशील विचारणा-या पत्रास सहा महिन्यांच्या आत वास्तुशास्त्रज्ञांकडून उत्तर न मिळाल्यास सदर प्रस्ताव दफ्तरी दाखल करण्यात येईल व आकारलेल्या शुल्कांपैकी ९० टक्के शुल्क पक्षकारांना परत देण्यात येईल. |
| 12 क) | महानगरपालिका ठरावाच्या तारखेपूर्वी आराखडे सादर केले असल्यास व प्रस्ताव दफ्तरी दाखल केला नसल्यास व ना मंजूरीचे प्रमाणपत्र प्रसृत केले नसल्यास, जरी सुधारित आराखडे महानगरपालिका ठरावाच्या तारखेनंतर सादर केले असले तरी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक नियोजित नसल्यास ज्यादा शुल्क आकारले जाणार नाही. | महानगरपालिका ठरावाच्या तारखेपूर्वी आराखडे सादर केले असल्यास व प्रस्ताव दफ्तरी दाखल केला नसल्यास व ना मंजूरीचे प्रमाणपत्र प्रसृत केले नसल्यास, जरी सुधारित आराखडे महानगरपालिका ठरावाच्या तारखेनंतर सादर केले असले तरी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक नियोजित नसल्यास ज्यादा शुल्क आकारले जाणार नाही. |
| | ना मंजुरीचे/ काम सुरु करण्याच्या प्रमाणपत्राकरीता पुनविधीग्राहयतेचे नियम : - | |
| 13 अ) | ना-मंजुरीचे प्रमाणपत्र प्रसृत केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत किंवा एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत 'ना-मंजूर प्रमाणपत्र' सक्षम | ना-मंजुरीचे प्रमाणपत्र प्रसृत केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत किंवा एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत 'ना-मंजूर प्रमाणपत्र' सक्षम अधिका-यांच्या |

| | | |
|---|---|---|
| | अधिका-यांच्या मंजूरीने विधीग्राह्य केलेले असल्यास, तर त्या निश्चित कालावधीमध्ये "काम चालू करण्याचा दाखला" न घेतल्यास 'ना-मंजूर प्रमाणपत्र' पुनर्विधीग्राह्य करण्यात येवू नये, व सदर आराखडे प्रस्तावच्या गटानुसार, प्रचलित नियमांच्या, व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदींनुसार पुन: नव्याने मंजूर करण्यात यावेत. | मंजूरीने विधीग्राह्य केलेले असल्यास, तर त्या निश्चित कालावधीमध्ये "काम चालू करण्याचा दाखला" न घेतल्यास 'ना-मंजूर प्रमाणपत्र' पुनर्विधीग्राह्य करण्यात येवू नये, व सदर आराखडे प्रस्तावच्या गटानुसार, प्रचलित नियमांच्या, व विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदींनुसार पुन:: नव्याने मंजूर करण्यात यावेत. |
| 13 ब) | योग्य सूचना दिल्यानंतर काम सुरु झाले आहे अशा ना मंजुरीच्या व काम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रांबाबत, प्रस्तावाच्या गटानुसार म्हणजे निवासी, औद्योगिक, व्यावसायिक गटानुसार पुनर्विधीग्राहयता प्रदान केल्यानंतर वरील प्रमाणपत्रे पुनर्विधीग्राहय करण्यात येतील. तथापि, मालमत्तेच्या मालकाच्या पत्रासह व वास्तुशास्त्रज्ञ त्यांच्याकडे अद्याप कामाला आहेत व कामाच्या प्रगतीचा तपशील सादर करण्यासह, मूळ मंजूर आराखडे, ना मंजुरीचे मूळ प्रमाणपत्र, काम सुरु करण्याचे मूळ प्रमाणपत्र सादर करावे लागतील. | योग्य सूचना दिल्यानंतर काम सुरु झाले आहे अशा ना मंजुरीच्या व काम सुरु करण्याच्या प्रमाणपत्रांबाबत, प्रस्तावाच्या गटानुसार म्हणजे निवासी, औद्योगिक, व्यावसायिक गटानुसार पुनर्विधीग्राहयता प्रदान केल्यानंतर वरील प्रमाणपत्रे पुनर्विधीग्राहय करण्यात येतील. तथापि, मालमत्तेच्या मालकाच्या पत्रासह व वास्तुशास्त्रज्ञ त्यांच्याकडे अद्याप कामाला आहेत व कामाच्या प्रगतीचा तपशील सादर करण्यासह, मूळ मंजूर आराखडे, ना मंजुरीचे मूळ प्रमाणपत्र, काम सुरु करण्याचे मूळ प्रमाणपत्र सादर करावे लागतील. |

कार्यकारी अभियंता (वि.नि.)शहर

उप प्रमुख अभियंता(वि.नि.)१

प्रमुख अभियंता(विकास नियोजन)(प्र)